# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

## ४१२, ई शिवाजीनगर पुणे - ४११ ०१६

☎ २५६५६२३४ फॅक्स २५६५६२३४ **E-Mail** – ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशिविकापु/आस्था-१/२०१९/ 84 दिनांक : 04 JAN 2020

प्रति,
संचालक / प्राचार्य
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था
पुणे विभाग

विषय – अखिल भारतीय व तंत्रशिक्षण परिषदेच्या मानांकानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून करावयाच्या कार्यवाहीबाबत ...

संदर्भ – मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,मुंबई यांचे पत्र क्र.४-४अ/आस्था/२०१९/ ६२१ दिनांक २७/१२/२०१९

उपरोक्त संदर्भिय परिपत्रकाचे अवलोकन करुन त्याप्रमाणे संस्थास्तरावर योग्य ती कार्यवाही करावी.

(डॉ.दि.रा.नंदनवार)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
पुणे

प्रत- संगणक विभाग यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

Endorsement

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६१०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

E-mail : desk4a@dte.maharashtra.gov.in Internet :http//www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक:- ४ - ४अ /आस्था/ २०१९/६२१

दिनांक:- 27 DEC 2019

विषय : अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मानंकानुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून करावयाच्या कार्यवाही बाबत.

संदर्भ : १. शासन निर्णय क्रमांक- सावेआ-१११११/प्र.क्र. ४४/१९/तांशि-२, दि. ११/०९/२०१९
२. शासन निर्णय क्रमांक- सावेआ-१११११/प्र.क्र. ४४/१९/तांशि-२, दि. ११/०९/२०१९

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या दि. ०१/०३/२०१९ अधिसुचनेतील निर्देशानुसार संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयान्वये तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधित्याखालील पदवी संस्थेतील अध्यापकीय पदांना ७ व्या वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार वेतन श्रेणी / शैक्षणिक अर्हता / कॅस अतर्गतच्या तरतुदी निर्गमित करण्यात आलेल्या आहे. संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयान्वये पदविका संस्थेतील अध्यापकीय पदांना ७ व्या वेतन आयोगाच्या तरतुदीनुसार वेतन श्रेणी / शैक्षणिक अर्हता / कॅस अंतर्गतच्या तरतुदी निर्गमित करण्यात आलेल्या आहे.

संदर्भाधिन दोन्ही शासन निर्णयात अध्यापकीय पदांचा शैक्षणिक कार्यभार, अध्यापकांचे शैक्षणिक मुल्यमापन (३६०° Feedback) व आवश्यक असलेल्या प्रशिक्षण / उजळणी वर्गाबाबत सुधारीत तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

या परिपत्रकाद्वारे सर्व पदवी व पदविका संस्था प्रमुखांना निर्देशित करण्यात येते की, संदर्भाधीन दोन्ही शासन निर्णयात नमूद केल्या प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून संस्थेतील अध्यापकांना शैक्षणिक भार देण्यात यावा, अध्यापकांचे शैक्षणिक मुल्यमापन अहवाल ३६० Feedback या प्रमाणे तयार करण्यात यावा. तसेच शासन निर्णयात नमूद केल्या प्रमाणे प्रशिक्षण व उजळणी वर्गाबाबतची तरतुद सर्व अध्यापकांच्या निर्दशनास आणावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाही करीता

१. मा.सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण, मंत्रालय, मुंबई
२. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये, यांना असे कळविण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील संस्थांचा आढावा घेतांना सदर परिपत्रकाची अंमलबजावणी करण्यात येत असल्याची खातरजमा करावी.
३. सर्व शासकीय पदवी / पदविका संस्था प्रमुख.

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे. 30 DEC 2019 आवक क्र. 93053